संफौ.प्र.क्र. ६३१/२०२१
निशाणी क्रमांक – १३ खाली
CNR- MHCH170010982021

# न्यायनिर्णय

(पारीत दिनांक: ०१/०६/२०२६)

आरोपीविरूध्द सदरील खटला भारतीय दंड विधानच्या (थोडक्यात ''भा.द.वि.'') कलम २९४ व ५०६ अन्वयेच्या शिक्षा पात्र असलेल्या गुन्हयासाठी चालविण्यात आला.

२. विद्वान सहायक सरकारी वकील – श्रीमती पी. व्ही. गंधारे व आरोपीचे विद्वान वकील – श्री. आर. जी. रामटेके यांचा युक्तीवाद ऐकला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहेत:

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, प्रस्तुत घटनेच्या वेळी आरोपीने सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणाजवळ फिर्यादीला अश्लील भाषेमध्ये शिवीगाळ केली? | **नाही** |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, प्रस्तुत घटनेच्या वेळी आरोपीने फिर्यादीला मारण्याची धमकी दिली? | **नाही** |
| ३ | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही** |
| ४ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

३. अभियोग पक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता केवळ फिर्यादी – प्रभाकर विठोबाजी पाकमोडे (सा.क्र.०१) यांची साक्ष नि.क्र.१३ खाली नोंदविली.

फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनाला सहकार्य न केल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांनी पुरसीस (नि.क्र.१६) दाखल करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरुद्ध कुठलाही गुन्हादर्शक पुरावा मिळुन न आल्या कारणाने त्याचे कलम ३१३ फौ.प्र.सं. अन्वयेचे बयाण विसर्जित करण्यात आले.

**मुद्दा क्र. १ ते ३:**

४. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकाच वेळी चर्चेकरिता घेण्यात आले.

५. सदर प्रकरणामध्ये आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविली. फिर्यादीने त्यांच्या सरतपासामध्ये सांगीतले आहे की, त्यांचा आरोपीसोबत तोंडी वाद झाला होता. त्यामुळे रागाच्या भरात त्यांनी तक्रार दिली होती. फिर्यादीने तक्रार (नि.क्र.१५) मधील मजकुर माहिती नसल्याचे सांगीतले. फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनाला सहकार्य न केल्यामुळे फिर्यादीची साक्ष अभियोगपक्षाला आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता तिळमात्रही उपयुक्त नाही.

६. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार अभियोग पक्षाला आरोपीचा गुन्हा सर्व शंकेपलिकडे सिध्द करणे क्रमप्राप्त होते. परंतु, सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला पुरावा हा त्रोटक स्वरुपाचा भासतो. सदर प्रकरणामध्ये फिर्यादीनेच अभियोगपक्षाच्या कथनाला सहकार्य केले नाही. याउलट फिर्यादी व

आरोपी यांनी संयुक्त पुरसीस (नि.क्र.१४) अन्वये त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कळविले. वरील सर्व बाबी विचारात घेता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४:**

७. वरील चर्चेप्रमाणे व वरील मुद्यांच्या निष्कर्षावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी – लक्ष्मण बाळाजी पिसे यांची कलम २९४ व ५०६ भा.द.वि. च्या गुन्हयातुन कलम २५५ (१) फौ.प्र.सं. अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. या प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली जमानत पुढील सहा महिण्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल व त्या जमानतीला कलम ४३७–अ फौ.प्र.सं. अन्वये जमानत म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व टंकलिखीत)

RUSHIKESH DILIP BHUYARKAR
Digitally signed by RUSHIKESH DILIP BHUYARKAR
Date: 2026.06.01 17:02:17 +0530

दिनांक :०१/०६/२०२६ (श्री. आर. डी. भुयारकर)
ठिकाण – चिमूर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर.

संं.फौ.प्र.क्र. ६३१/२०२१
निशाणी क्रमांक – १३ खाली
CNR- MHCH170010982021

**–: प्र मा ण प त्र :–**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एम. एस. परदेशी. |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर, ता.चिमूर, जि. चंद्रपूर. |
| मा. साहेबांनी चेक केले व पी.डी.एफ. दिनांक | : | ०१/०६/२०२६ |

सही/–
लघुलेखकाची सही